# संरक्षण क्षेत्रात करिअरच्या मुबलक संधी

## डॉ.नरेंद्र विसपुते

**कोल्हापूर,ता.२५(प्रतिनिधी)-**

भारतीय संरक्षण क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या मुबलक संधी आहेत. त्यासाठी योग्य तयारी करून त्यांचा लाभ घेण्यासाठी युवकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे मत मुंबई दूरदर्शन केंद्राचे सहाय्यक संचालक व संरक्षण विभागाचे माजी जनसंपर्क अधिकारी डॉ. नरेंद्र विसपुते (आय.आय.एस.) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने आयोजित ऑनलाईन व्याख्यान मालेमध्ये 'संरक्षण क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर ते बोलत होते.

डॉ. विसपुते यांनी संरक्षण क्षेत्रात करिअर करण्यासाठी अगदी पहिलीपासून कशा प्रकारे शैक्षणिक संधी आहेत, याची तपशीलवार माहिती दिली. ते म्हणाले, जिथे जिथे संरक्षणविषयक क्षेत्रे, कार्यालये आहेत, अशा कॅन्टॉनमेंट क्षेत्रामध्ये आर्मी, नेव्ही, एअर फोर्स यांच्या शाळा असतात. अशा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येतो. सी-कॅडेट' स्कूलमध्ये चौथीपासून प्रवेश घेता येतो. तिथे या विद्यार्थ्यांना अगदी तराफा बांधणीपासून ते तराफा,छोट्या बोटी चालविण्याचेही प्रशिक्षण देण्यात येते. त्याखेरीज देशभरात ३१ सैनिक स्कूल आणि पाच मिलीट्री स्कूल आहेत. त्यामध्ये सहावी आणि नववी या दोन टप्प्यांवर प्रवेश घेता येतो. दहावीनंतर तिन्ही संरक्षण दलांमध्ये ग्राऊंड लेव्हल भरती करण्यात येते. त्यांत जवानांपासून ते सर्व प्रकारच्या पदांच्या भरतीचा समावेश असतो.

यावेळी केंद्राचे समन्वयक डॉ. पी.एस. कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

महासत्ता एकच आवृत्ती

# समाजाभिमुख शिक्षण देण्यासाठी दूरशिक्षण केंद्र कटिबध्द–प्रा.नाईक

कोल्हापूर,ता.२५(प्रतिनिधी)-

..................................

गणितीचा दैनंदिन जीवनात सातत्याने उपयोग होत असतो. त्यामुळे गणितीय दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुरेख संगम आहे. समाजाभिमुख शिक्षण देण्यासाठी दूरशिक्षण केंद्र कटिबध्द आहे, असे प्रतिपादन दूरशिक्षण केंद्रातील गणित विषयाचे प्रा.डॉ.यु.एच.नाईक यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या वतीने उच्चशिक्षण आणि रोजगाराच्या संधी या विषयावरील आयोजित ऑनलाईन करिअर मार्गदर्शन पंधरवाडा–२०२१ मधील एम.एस्सी. गणित विषयातील करिअरच्या संधी या व्याख्यानात ते बोलत होते.

प्रा.डॉ.नाईक म्हणाले की,आयुष्याचे गणित सुरळीत करण्यासाठी गणित हा विषय महत्वाचा आहे.गणित या विषयातून सांख्यिकी,भूमापन,वैद्यकीय, शेअर मार्केट, संगणक,एल.आय. सी, बँकींग, शैक्षणिक व विमा आदी क्षेत्रामध्ये करिअरच्या संधी आहेत. दूरशिक्षण पध्दती आजच्या काळात महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.त्यामुळे दूरशिक्षणाकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्यक्ष अनुभव व दूरशिक्षण केंद्रातील पदवी निश्चित रोजगाराची संधीकडे घेवून जाईल. स्वागत व प्रास्ताविक सहा. प्रा.दयानंद गावडे यांनी केले. तर आभार सहा. प्रा. परशराम देवळी यांनी केले.

पुढारी

# 'सर्क्युलर इकॉनॉमी' बाबत आज विद्यापीठात वेबिनार

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २५) दुपारी तीन वाजता 'सर्क्युलर इकॉनॉमी' या विषयावर एकदिवसीय वेबिनारचे आयोजन केले आहे. वेबिनारमध्ये डॉ. अजय देशपांडे (आय.आय.टी. मुंबई), डॉ. चरणसिंह आहुजा (मुंबई) व जी. जी. सोहनी (पुणे) मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत. विद्यार्थी, संशोधक, शिक्षक व अभ्यासकांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नावनोंदणी करून वेबिनारमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

25 SEP 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य विकसित केल्यास रोजगाराच्या संधी

## प्रा. डॉ. मुकुल जोशी; दूरशिक्षण केंद्रात 'ऑनलाईन करिअर मार्गदर्शन पंधरवडा'



**टेंबलाईवाडी, ता. २४ :** कोरोनाच्या नवीन संकटामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक बदल होत आहेत. अशातच शैक्षणिक क्षेत्रात तंत्रज्ञाच्या माध्यमातून कौशल्य विकसित केल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, असे भारती विद्यापीठाच्या आबेदा इनामदार कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्सच्या इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. मुकुल जोशी यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रात 'उच्चशिक्षण आणि रोजगाराच्या संधी' या अंतर्गत झालेल्या 'ऑनलाईन करिअर मार्गदर्शन पंधरवाडा २०२१'मध्ये 'इंग्रजी विषयातील करिअरच्या संधी' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या.

डॉ. जोशी म्हणाल्या, "विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात असताना त्याला पूरक कौशल्यावर आधारित शॉर्टटर्म कोर्सेसची जोड दिली पाहिजे. जेणेकरून कौशल्याच्या आधारामुळे मुख्य विषयाला शिक्षणामध्ये बळकटी मिळून निरंतर चालना मिळू शकते. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या जगात नव्याने येऊ घातलेले तंत्रज्ञान अवगत करून स्वतःला अद्यावत करता आले पाहिजे. इंग्रजी विषयातील पदवी व पदव्युत्तर शिक्षणाबरोबर तंत्रज्ञान आणि कौशल्याच्या आधारे नवीन कोणत्याही क्षेत्रात स्वतःची व्यवस्था अथवा रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. शिवाय खासगी क्षेत्र, प्रकाशन संस्था, ऑनलाईन वेबसाइट, डिजिटल मार्केटिंग, थिएटर मीडिया, स्पर्धा परीक्षा आदी क्षेत्रात इंग्रजी भाषेतून करिअर करणाऱ्यांना अनेक संधी उपलब्ध आहेत." वाणिज्य शाखेतील करिअर या विषयावर प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी मार्गदर्शन केले. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना चार्टड अकौंटट, कंपनी सेक्रेटरी, बँकिंग, विमा आदी क्षेत्रामध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नोकरी व व्यवसायाच्या संधी आहेत, असे त्यांनी सांगितले. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी स्वागत केले. प्रा. परशराम देवळी यांनी आभार मानले.

# नियोजन, परिश्रमातूनच यश मिळते

## मदन नागरगोजे; स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

टेंबलाईवाडी, ता. २४ : नियोजनपूर्वक केलेला अभ्यास, प्रयत्नातील सातत्य आणि कठोर परिश्रम घेतले की स्पर्धा परीक्षेत यश हमखास मिळते, असे मत सनदी अधिकारी मदन नागरगोजे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते.



**मदन नागरगोजे**

नागरगोजे म्हणाले, "स्पर्धा परीक्षेची तयारी शालेय स्तरापासून केली पाहिजे. शालेय आणि महाविद्यालयीन वयातच इंग्रजी, मराठी या भाषा चांगल्या पद्धतीने अवगत केल्या पाहिजेत. अवांतर वाचनाची सवय लावली पाहिजे. प्रत्यक्ष स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना स्वतःचे वेळापत्रक बनवावे. दहा ते बारा तास अभ्यास करावा लागतो. अभ्यासाबरोबरच इंग्रजी वर्तमानपत्रांचे वाचन करावे. इंग्रजी बातम्या ऐकाव्यात. पुस्तकांची यादी करून त्याच्या नोट्स काढाव्यात. इंटरनेटचा अधिकाधिक वापर कारावा. अभ्यासाबरोबरच खेळ, व्यायामही करावा. शारीरिक तंदुरुस्तीलाही महत्त्व दिले पाहिजे." या केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक व वक्त्यांचे स्वागत केले.